

# एका दारुड्याची खरी कहाणी

जेव्हा बाबा खुश असत तेव्हा ते आपल्या मुलीला व्हरांड्यात झोक्यावर बसवून गाणी म्हणत आणि काजवे दाखवत. जेव्हा बाबा व्हिस्की पिण्यासाठी जात नसत, तेव्हा ते शनिवारी सकाळी बागेत काम करत आणि आईबरोबर शनिवारी दुपारी ते फिरत आणि आनंदी होत असत.

पण कधीकधी जेव्हा ते दारू पीत तेव्हा बाबा रागाने राक्षस होत. ते आईवर चिडत-ओरडत आणि छोट्या मुलीचा खांदा धरून ओढत. “माझ्यावर नजर ठेवू नको!” ते आपल्या मोठ्या आवाजात ओरडत. ते ज्या बाटल्या लपवत त्या व्हिस्कीचा घाण वास त्यांच्या श्वासातून येई. मुलीच्या दृष्टिकोनातून लिहलेली ही कहाणी दारूच्या विरोधात केलेली पूर्ण कुटुंबाची मार्मिक, प्रामाणिक गोष्ट आहे. जी मुलं अशा परिस्थितीत राहत आहेत, त्यांना छोट्या मुलीबाबत आत्मियता वाटेल. ते तिच्या भावना समजून घेवू शकतील.



# एका दारुड्याची खरी गोष्ट

मराठी : अश्विनी बर्वे



माझे बाबा जेव्हा राक्षसाच्या रुपात नसतात तेव्हा ते मला खूप आवडतात. जेव्हा ते खुश असतात तेव्हा ते त्यांच्या मांडीवर बसवून मला खाऊ घालतात आणि मला गोष्टी सांगतात. जेव्हा मला झोप येत नाही तेव्हा ते व्हरांड्यात झोक्यावर बसवून माझ्यासाठी छानसं गाणं म्हणतात. अंधारात आम्ही दोघं काजवे चमकतांना बघतो.





जर ते व्हिस्की पिण्यासाठी बाहेर जात नाही, तेव्हा ते फक्त बाबा असतात. शनिवारी सकाळी-सकाळी ते सगळ्यांबरोबर बागेत काम करतात. ते जेव्हा गवत कापत तेव्हा मी तण उखडत असे आणि त्यांच्याकडे बघत बसे आणि विचार करे की अजून आम्हांला कोणतं काम करायचं आहे.

शनिवारी दुपारी आई, बाबा आणि मी पार्कमध्ये पिकनिकला जातो.आमचे ओठ निळे होईपर्यंत आम्ही पोहतो. मग आम्ही काही हॉट डॉग भाजतो. ते लाकूड पेटवण्यासाठी मला मदत करत. “तू जो काळा हॉट डॉग केला आहे ना तो मला खूप आवडतो,” असे ते म्हणत.







सामान्यतः बाबांचं वागणं चांगलं असे. पण मला माहित नाही की केव्हा वेडं होवून ते रागाने राक्षसासारखं वागत. या उन्हाळ्यात तर आईपण मला रागवत होती. एक दिवस अंथरुणावर मी झोपलेली असतांना आई वडिलांच्या पिण्याविषयी एवढ्या जोरात ओरडली की, मी झोपू शकले नाही. जवळजवळ रोज रात्री त्यांचे मोठ्याने बोलण्याचे आवाज जिन्यात येत असत. आणि अंधारात आई-बाबांच्या बेडरूममधल्या आकृत्या चेटकिणीच्या रुपात बदलतांना दिसत.

एकदा बाबांच्या कपाटात बुटांच्या खाली मला एक व्हिस्कीची बाटली सापडली. ते गॅरेजमधल्या कपाटात बाटल्या लपवून ठेवत. ते जिन्याच्या खाली कोठीघरात सुद्धा दारूच्या बाटल्या लपवून ठेवत एकदा ते कोठीघरात गेले आणि त्यांनी आतून दरवाजा बंद करून घेतला. ते बाहेर येईपर्यंत मी हॉलमध्ये त्यांची वाट बघत राहिले.





“तुम्ही तिथं काय करत होते?” मी बाबांना विचारलं. बाबांनी जोरात माझे खांदे पकडले, “माझ्यावर नजर ठेवू नको,” ते रागानं ओरडले. त्यांनी खाली वाकून मला जोरात हलवलं. त्यांचा आकार एका घरा इतका मोठा होता. कदाचित एका पहाडाइतका मोठा. त्यांच्या श्वासात मला बाटलीतला घाण वास येत होता.

मी पळत माझ्या खोलीत गेले आणि मी माझी बाहुली काढली. मी माझ्या बाहुलीचे दोन्ही पाय खेचून तोडून टाकले.



दुसऱ्या दिवशी जेव्हा बाबा झोपलेले होते तेव्हा आई म्हणाली, “मला वाईट वाटते मी पुऱ्या उन्हाळ्यात तुझ्याशी नीट वागले नाही. जेव्हा मी आणि बाबा भांडतो तेव्हा नक्कीच तुला भीती वाटत असेल.” मला काय उत्तर द्यावं कळलं नाही म्हणून मी फक्त खिडकीतून बाहेर बघितलं. माझे मित्र फुटपाथवर ठिकरी खेळत होते.

“वडिलांच्या पिण्यामुळे सगळ्या लोकांचे आयुष्य कठीण होवून जाते,” आई म्हणाली. “आज काही लोक, जे बाबांवर खूप प्रेम करतात, ते त्याविषयी त्यांच्याशी बोलायला येणार आहे, त्यांच्या पिण्याविषयी आम्हांला काय वाटतं? याविषयी आम्ही आज त्यांच्याशी बोलणार आहोत.”

मग आईने आपल्या हाताने माझा चेहरा पकडला आणि माझ्या डोळ्यात बघितलं. “तुला काहीच बोलायचं नाही, इथं तू थांबायचं नाही आणि काही ऐकायचं नाही. पण मला वाटतं की बाबांना तुझ्या भावना समजून घेण्याची इच्छा असेल. जर तुला वाटलं तर तू त्यांना सांग.” मला वाटलं की बाबा माझ्यावर राक्षसासारखे उभे आहेत, ते मला हलवत आहेत आणि त्यांच्यावर नजर ठेवल्याबद्दल मला ओरडत आहे. त्यामुळे माझ्या पोटात इतकं दुखायला लागलं की मी जेवू सुद्धा शकले नाही.,



मग एक-एक करून लोक यायला लागले. आजी आणि बाबांचे मित्र बॉब कामावरून आले.मग सगळेजण काका, माझी आई, मला स्वयंपाकघरात भेटले. सगळेजण टेबलभोवती बसले आणि ते हलक्या आवाजात बोलू लागले.त्यांनी गोड डोनट खाल्ले आणि कॉफी प्यायली. आईने मलापण एक घोट कॉफी दिली. जेव्हा आजीने जिन्यावर वडिलांच्या पावलांचा आवाज ऐकला तेव्हा तिने लगेच बोलणं बंद केलं.



आईने मोठ्या प्रेमाने वडिलांच्या हातात हात घातला, “आमच्या बरोबर ये, बस,” ती म्हणाली. “थोडी कॉफी घे” आई कितीतरी दिवसांत एवढं प्रेमानं बाबांशी बोलली नव्हती. वडिलांनी आपल्या मिशावरून हात फिरवला आणि आपल्या आंघोळीच्या गाऊनच्या खिशात हात घालून ते बसले आणि आपले पाय हलवू लागले. “ही कोणाची पार्टी चालू आहे,” बाबांनी विचारलं. “तुमचीच” निक काका म्हणाला. बाबा हसले नाही, त्यांनी कोणाच्या डोळ्यात बघितले सुद्धा नाही..





एक-एक करून सगळेजण बोलू लागले. त्यांनी बाबांना त्यांच्या दारू पिण्याबद्दल सांगितलं. निक काकाने बंदरातून पडतांनाच्या प्रसंगाची आठवण करून दिली. मला पण ते लक्षात आहे. त्यांनी त्यासाठी मला दोषी ठरवलं कारण बोटीला मी नीट पकडू शकले नव्हते. मग ते माझ्यावर त्यांचा चेहरा लाल होईपर्यंत चिडले होते. नंतर आईने त्यांच्या खिश्यातले ओले पैसे कपड्यांसारखे वाळवले होते.

मागच्या वेळी जेव्हा आम्ही मासे पकडायला गेलो होतो तेव्हा त्यांनी नशेत माझ्या गालात ठेवून दिली होती. निक काका म्हणाले, “तू माझा एकुलता एक भाऊ आहे. तुला अशा अवस्थेत बघून मला बरं वाटत नाही.” मी कापू लागली. “माझ्या पिण्याशी कोणाला काही देणं घेणं नाही!” बाबा मोठ्या आवाजात म्हणाले. मग त्यांनी टेबलवर जोरात एक बुक्का मारला त्यामुळे प्रत्येकाची कॉफी सांडली. “यात मला घेणं आहे,” निक काका म्हणाले. “तू नशेमध्ये माझ्या छोट्या मुलीला घेवून गेला होता.”







आजीने बाबांना त्या प्रसंगाची आठवण करून दिली, जेव्हा त्यांनी आजीच्या वाढदिवशी टेबलावरून केक खाली पडला होता. आजी केक वरच्या मेणबत्या सुद्धा विझवू शकली नव्हती. आजी आपल्या वाढदिवशी रडली होती. त्यादिवशी फक्त कुत्रा खुश होता, कारण गालिच्यावर पडलेला केक त्याला चाटायला मिळाला होता.

“आम्ही सगळे तुझ्यावर प्रेम करतो. तू तुझ्या चांगल्यासाठी डॉक्टरांची मदत घे,” आजी कापऱ्या आवाजात वडिलांना म्हणाली. बाबांनी आजीकडे बघितले, “मला काही डॉक्टरांची गरज नाही. मी थोडं बरं वाटावं म्हणून थोडं पितो बास, जसे सगळेजण पितात.” मी आपला अंघोळीचा गाऊन घट्ट लपेटून घेतला. माहित नाही मला केव्हा बोलावतील?



“व्यसनामुळे तू दर आठवड्यात एकदातरी खाडा करतो,” बॉब म्हणाला. “काल तू एका ग्राहकावर खूप रागवला, मी नेहमी तुला साथ दिली आहे, पण आता कदाचित तुला नोकरी सोडायला सांगेन.”

“ही काय बकवास आहे!“ बाबा म्हणाला. त्यांना विश्वासच नव्हता की बॉब त्याच्या बाबतीत असं काही म्हणेल. “तू मला खरंच नोकरीवरून काढून टाकशील.”

“तू कधीकाळी माझा सगळ्यात चांगला माणूस होता. पण आता बाकी लोक तुझी तक्रार करतात, कारण तू तुझ्या वाट्याचं काम करत नाही.”

मला बॉबने केलेली बाबांविषयीची तक्रार ऐकायला आवडली नाही. पण मला आठवतं, बाबा कितीतरी वेळा कामावर जाण्यासाठी लवकर उठत नसतं. मागच्या वेळी आई यामुळे बाबांवर खूप रागवली होती. तिने वडिलांचे पांघरून ओढले आणि खिडकी उघडली. मग बाबांच्या उघड्या पायावर बर्फ उडून आला, ते आपल्या मोठ्या आवाजात आईवर ओरडले आणि त्यांनी पांघरून ओढून घेतले आणि दुपारच्या जेवणापर्यंत ते झोपून राहिले.





मी माझे हात चेहऱ्यावर ठेवले आणि बोटांच्या फटीतून मोठ्यांच्या मध्ये चाललेली वादावादी बघत राहिली. जर बाबांची नोकरी गेली तर माझं काय होईल?

आता आईची पाळी होती.तिने सहलीच्या वेळची आठवण करून दिली, जेव्हा बाबाने आपल्या पिशवीत व्हिस्कीची बाटली लपवून ठेवली होती. ते एवढे नशेत होते की ते तंबू सुद्धा उभारू शकले नाही. तिने त्या गोष्टीची सुद्धा आठवण करून दिली जेव्हा बाबा मला नशेत असतांना शाळेतून घेवून आले, तेव्हा आमची कार दरीत पडता पडता वाचली..



“आता मी हे सगळं जास्त काळ सहन करू शकत नाही!” आई म्हणाली. त्यानंतर ती इतक्या हळू आवाजात बोलली की मला काही ऐकू आलं नाही. “माझं तुमच्यावर प्रेम आहे, पण मी तुमच्या या पिण्याच्या सवयी बरोबर राहू शकत नाही. मी दवाखान्यातल्या लोकांशी बोलले आहे. एकतर तुम्ही इलाज करायला जा, नाहीतर मी घर सोडून निघून जाईन.”

बाबांनी आपला कॉफीचा टेबलवर ठेवला आणि म्हणाले, “मी जेव्हा पाहिजे तेव्हा दारू पिणं बंद करू शकतो.”





मग सगळ्यांनी वळून माझ्याकडे पाहिलं. मी तोंड उघडलं पण त्यातून शब्दच बाहेर पडले नाही. आई जर वडिलांच्या बरोबर राहणार नाही तर ती कुठे राहिल? ती मला बरोबर घेवून जाईन का? मी स्वतःला एका छोट्या मुंगी इतकं समजू लागले. मी बाबांना काय सांगणार होते? जर मी त्यांना काही सांगितलं तर ते मला परत पकडून जोरजोरात हलवतील. पण आता मला बाबा वेडे वाटत नव्हते. उलट त्यांनी माझ्या खुर्चीच्या जवळ येवून आपले गुडघे टेकवले आणि माझ्या कानात ते कुजबुजले, “तुला काय वाटतं?”

“जेव्हा तुम्ही माझ्यावर ओरडतात आणि मला जोरजोरात हलवता तेव्हा मला खूप भीती वाटते,” मी परत कुजबुजले.

मग बाबांनी मला प्रेमाने जवळ घेतलं. “मला वाटतं की झोपायच्या वेळी तुम्ही मला व्हरांड्यातल्या झोक्यावर बसवून झोका द्यावा ,मला गाणी ऐकवावी आणि आपण अंधारात काजवे मोजावे,” मी त्यांच्या कानात म्हणाले.



मग बाबा आपल्या खुर्चीवर बसले आणि दोन्ही हातांनी त्यांनी आपलं डोकं पकडलं. ते खूप थकल्यासारखे वाटत होते आणि त्यांना सरळ बसता येत नव्हतं. मग खूप वेळ कोणीच काही म्हटलं नाही.

बाबांनी आईकडे बघितलं आणि म्हटलं, ”मला विचार करण्यसाठी थोडा वेळ दे.” मग ते खाली तळघरात गेले. आम्हांला खाली खिळे ठोकण्याचा आवाज येत होता. हळूहळू पाहुणे आपआपल्या घरी गेले. खूप वेळ घर सुनसान होतं. मग शेवटी बाबा हळूहळू जिना चढून वर आले. “मी इलाज करायला जाईन,” त्यांनी आईला सांगितलं. “तू मला सामान बांधायला मदत करशील का?”



आई आणि बाबा मागे गेले आणि ते आपली सुटकेस भरतांना मी पाहिलं. त्यांनी टूथब्रश आणि रेजर एका चामड्याच्या पिशिवीत भरलं आणि ते पलंगावर बसले. आईने त्यांचे आतले कपडे आणि मोजे झटकून त्यांच्या घड्या घातल्या. जसे की ते जिवंत व्हावेत. मग ती त्यांच्याजवळ येवून बसली. मी माझा टेडी बियरला जवळ घेतलं आणि एकही शब्द बोलली नाही. “तुला असं वाटतं का की मी तुझ्या चुकीमुळे दूर जात आहे?” बाबांनी विचारलं. टेडीने माझ्यासाठी डोकं हलवलं. “तू मला जाण्यासाठी योग्य ती ताकद दिलीस.” बाबा म्हणाले.

“तुम्ही माझ्या टेडीला उधार घेवू शकतात, मग तुम्हांला अंधाराची भीती वाटणार नाही.” मी म्हणाले. मग आम्ही सगळ्यांनी एकमेकांना जवळ घेतलं-टेडी आमच्या मध्ये होता.



वडील पुष्कळ दिवसासाठी दवाखान्यात गेले. आम्ही पाच रविवार त्यांच्याशिवाय जेवलो.पाच शनिवार मी टिव्हीवर कार्टून पाहिलं आणि आईने शब्दकोडं सोडवलं. “हे कोडं मी जुन्या आठवणी ताज्या करण्यसाठी सोडवत आहे,” आई म्हणाली.

आता आईने प्रत्येकवेळी रागवणं सोडून दिलं. अंथरुणावर झोपण्यापूर्वी आता कोणीही माझ्यावर ओरडत नव्हते. आईने माझ्यासाठी नाईट लॅम्प घेतला. “या उजेडात तू बघू शकशील की कोणत्याही सावल्या अस्वल आणि चेटकिणी नसतात.” मग मी आई बरोबर बसून माझ्या बाहुलीचे पाय परत शिवले. रोज मी आणि आई जेवण झाल्यावर तलावावर फिरायला जात असू. जीवनरक्षक आमच्या सुरक्षेसाठी आम्हांला मनोऱ्यावरून बघत असे. कधी कधी घरी येतांना आम्ही उड्या मारत येत असू.



आज सकाळी जेव्हा आई बाबांचा इलाज झाला म्हणून घरी घेवून आली तेव्हा त्यांच्या बगलेत टेडी बियर होता. मी त्यांना बघून धावले आणि एका झाडाच्या मागे जावून गुपचूप लपून बसले. मी निरखून बघत होते की ते खरंच माझे बाबा आहेत की राक्षस? “माझी छोटी मुलगी कुठे आहे?” वडिलांनी विचारलं. “मला माझ्या प्रेमळ गोड मुलीला बघायचं आहे. ते आता सरळ-साधे फक्त माझे बाबा होते. मी त्यांच्या पाठीवर चढले आणि “भो” केलं.



हसत त्यांनी मला उचललं आणि पहिले करत तसं गोल-गोल फिरवलं. आई घरात गेली. “तू अजूनही मला घाबरते?” बाबांनी विचारलं. मी हो म्हटलं. “जास्त व्हिस्की प्यायल्याने मी भीतीदायक झालो होतो. आता मला वाटते की माझं व्यसन सुटेल. मी प्रयत्न करत आहे,” ते म्हणाले. “आता जर मला काही काम करायचं झालं तर मला मदत करशील?”



मग मी आणि बाबांनी त्यांनी लपवलेल्या बाटल्या शोधून एकत्र केल्या. काही अशा गुप्त जागी होत्या की त्या मला माहितीच नव्हत्या. त्यांनी उरलेली व्हिस्की सिंक मध्ये ओतून दिली आणि रिकामी बाटल्या कचऱ्यात टाकल्या, त्याने पुरी एक बॅगे भरली.

“नशे शिवाय राहणं सोप्प जाणार नाही,” बाबा म्हणाले. “पण मी रोज तसं राहण्याचा प्रयत्न करेन.आता मला भीतीदायक व्हायचं नाही.” आज बाबांनी रात्री मला झोक्यावर बसवले आणि जुनी गोड गाणी म्हटली. “चला आता काजव्यांच्या शेपटीचा उजेड मोजू या” ते म्हणाले. आम्ही २३ काजवे मोजले. दुसऱ्या दिवशी लॉन गवत आणि घास कापल्यावर आई-बाबा तलावावर पिकनिकला जावू. आम्ही आमचे ओठ निळे होईपर्यंत पोहत राहू. मग आम्ही शेकोटीत गरम "हॉट-डॉग्स“ करू. मी बाबांसाठी हॉट-डॉग्स भाजेन, जे त्यांना खूप आवडतात.



**समाप्त**

